# परिपत्रक

**स्वयंसूची धारीका अद्यावत करणे बाबत.**

क्र,/ एस व्ही सी आर २६४५/ स - ३/ १९९४
पुणे दिनाक :- १२/१२/ १९९४

नगर भूमापन कार्यालयातील एकाच परिरक्षण भूमापकाकडे स्वयसूची धारीका व मिळकत पत्रिका ठेवल्यामुळे गैरकृत्य होण्याची शक्यता असते तसेच प्रत्येक नगर भूमापन क्रमाकासाठी स्वतत्र स्वयसूची धारीका असते तसेच प्रत्येक नगर भूमापन क्रमाकासाठी स्वतत्र स्वयसूची धारीका नसते स्वयसूची धारीका एकच सलग्न ठेवली जात नाही व तिचा भाग हा शासकीय कामासाठी पाठविला जातो स्वयसूची धारीकेला पानाक जॅकेट फॉर्म लावला जात नाही. इत्यादी त्रुट्या असल्याचे मा उपलोक आयुक्त यानी एका प्रकरणात निदर्शनास आणून देवून त्यात सुधारणा करणेच्या सूचना दिल्या आहेत म्हणून याकामी उपसचालक भूमि अभिलेख, पुणे/ मुबई/ नागपूर/ नाशिक/ ओरगाबाद/ अमरावती/ यानी या प्रश्नाचा सारासार विचार करून अभिप्राय दिले आहेत त्या अनुषगाने स्वयसूची धारीका सुस्थितीत य अद्यावत ठेवणेबाबत खालील प्रमाणे सूचना देणेत येत आहेत

ज्या नगर भूमापन कार्यालयात परिरक्षण भूमापक सलग्न आहे (कार्यालयातच आहे) त्या परिरक्षण भूमपकाच्या मिळकत पत्रिका ज्या त्या परिरक्षण भूमापकाकडे ठेवाव्यात व स्वयसूची धारीका ह्या अभिलेखापालाचे पद उपलब्ध असल्यास त्याचे ताब्यात ठेवाव्यात पद उपलब्ध नसल्यास त्या शिरस्तेदार किवा शिरस्तेदार पद नसल्यास सबधीत नगर भूमापन लिपिक अगर प्रमुख लिपिक याचे देखरेखीखाली ताब्यात ठेवाव्यात त्यामुळे सबधीत कर्मचारी/ अधिकारी स्वयसूची धारीकेस जबाबदार राहतील स्वयसूची धारीका १००/ १००/ च्या गठ्ठयात बाधून कापडी बस्त्यात सुरक्षित ठेवण्याबाबत यापूर्वीच सूचना देणेत आलेल्या आहेत त्याचे काटेकोरपणे पालन केले जात नाही म्हणून प्रत्येक स्वयसूची धारीकेत जॅकेट फॉर्म लावून त्यातील सर्व रकाने व्यवस्थित भरावेत तसेच धारीकेस पानाक करून परिरक्षण भूमापक यानी जॅकेट फार्मवर दिनाकीत स्वाक्षरी करणेची आहे तसेच सबधीत नगर भूमापन क्रमाकाबाबत हवाल याचा दाखलही नगर भूमापन क्रमाकाप्रमाणे गठ्ठ्यात ठेवणेचा आहे म्हणचे हवाल्याच्या दाखल्यावरून स्वयसूची धारीका शोधणे सोपे जावून पुढील नोदीचे कागदपत्र लावणे सोईचे होईल स्वयसूची धारिकेची स्वतत्र घालकाढ नोदवही ठेवावी नगर भूमापन पुस्तिकेतील परिच्छेद १५३ प्रमाणे एखादा पत्रव्यवहार अनेक मिळकतीच्या सबधीत असल्याने सदरचा पत्रव्यवाहार ज्या मिळकतीवर सविस्तर मूळ प्रत ही ज्या नगर भूमापन क्रमाकात नोद केली जाते त्या मिळकतीची स्वयसूची धारीकेत समाविष्ट करण्यात येतो परतू ती स्वयसूचीधारीका गहाळ झाली तर इतर मिळकत पत्रिका तपासता येत नाही त्यामुळे आता अशा पत्र व्यवाहाराची छायाकित प्रत/ प्रति तयार करून सबधीत नगर भूमापन अधिकारी यानी त्या प्रमाणित कराव्यात व प्रमाणित केलेल्या प्रति ह्या सबधित नगर भूमापन क्रमाकाचे स्वयसूची धारिकेत लावावे नोद केली आहे त्या नगर भूमापन असलेल्या स्वयसूची धारीकेस ठेवावी

४. मुळ नगर भूमापन क्रमाकाचे पोट हिश्याने नवीन मिळकत पत्रिका उघडल्या जातात. पोट हिश्याच्या मोजणी शिट, आदेश व तत्सम कागदपत्रे हे मूळ धारीकेलाच ठेवावे व त्याच्या प्रति करून नवीन पोट हिस्सा मिळकतीच्या नगर भूमापन क्रमाकाला ठेवाव्यात. तदनतर धारक सदरी होणारे बदलाचे कागदपत्रे त्या नवीन उघडलेल्या मिळकत पत्रिकेस लावावित.

उदा. नगर भूमापन क्रमाक १०० याचे पोटहिस्से होऊन त्यात १ ते ५ उपविभाग उघडले गेले असता मूळचे सर्व कागदपत्रे १०० या नगर भूमापन क्रमाकाच्या धारीकेत ठेऊन नगर भूमापन क्रमाक १ ते ५ चे उपविभाजन ज्या आदेशाने हुकमाने करण्यात आले असेल त्या आदेशाच्या हुकमाच्या छायाकित प्रत/ प्रति पोटहिस्सा शिट व तत्सम कागदपत्रे तयार करून त्या नगर भूमापन अधिकारी यानी प्रमाणित कराव्यात व त्या नगर भूमापन क्रमाक १ ते ५ यात लावाव्यात म्हणजेच नगर भूमापन क्रमकावर स्वयंसूची धारीका उघडून जॅकेट फॉर्म लावून ती मुळचे नगर भूमापन क्रमाका लगत ठेवावे व नगर भूमापन क्रमाक १००/ १ चे पुढे जे बदल होतील ते त्यास लावावे.

५ स्वयसूची धारिका न्यायालयात/ वरिष्ट कार्यालयात किवा अन्य शासकिय कामात पाठविताना ती मूळ दाखल न करता मूळ स्वयसूची धारिकेमधील कागदपत्राच्या छायाकित प्रत/ प्रति तयार करून त्या संबधीत नगर भूमापन अधिकारी यानी प्रमाणित करून अशा कागदपत्राची धारिका तयार करावी व सदर धारिकेस पानाक देवून सादर करावी त्यामुळे नगर भूमापनाकडील भविष्यकाळातील कामे करणे सोईचे होईल व अडचण भासणार नाही व धारीका गहाळ होणेचे प्रश्न उद्‌भवणार नाही त्याप्रमाणे कोर्टाने मुळ कागदपत्रे मागणी केली असल्यास ते त्याना समक्ष दाखवून पुन्हा प्राप्त करून घ्यावे

वरील परिपत्रकातील मुद्‌दे क्रमाक २ ते ५ याची सर्व नगर भूमापन अधिकारी/ तालुका निरीक्षक भूमि अभिलेख/ परिनिरीक्षण भूमापक/ शिरस्तेदार/ वरिष्ठ लिपिक यानी काटेकोरपणे अमलबजावणी करणेची आहे तसेच नियत्रण अधिकारी यानीही सदर परिपत्रकाची अमलबजावणी केली जाते किवा नाही याची पडताळणीही त्याचे दोऱ्याचेवेळी व निरीक्षक ज्ञाप काढतेवेळी करावी तसेच परिरक्षण भूमापक याचे कार्यायाची तपासणी वेळी सदर मुद्याची अनिवार्यपणे पडताळणी केली जाईल याकडे विशेष लक्ष द्यावे.

सही /-XXX
जमाबदी आयुक्त आणि सचालक
भूमि अभिलेख, ( म राज्य.) पुणे